॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

**बातमी क्र. १**

जळगाव दि.६ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या अधिसभा सदस्य पदी धुळे जिल्हा परिषदेच्या सदस्या श्रीमती नुतन निकम-पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

विद्यापीठ कायदा २०१६ च्या २८ (२) (य) अन्वये शिक्षण समितीने एका वर्षाच्या कालावधीसाठी विद्यापीठ क्षेत्रातील जिल्हा परिषदेच्या शिक्षण समित्यांचा एक प्रतिनिधी अधिसभेवर कुलगुरुंकडून नामनिर्देशीत केला जात असतो. धुळे जिल्हयातील कापडणे येथील श्रीमती नुतन निकम -पाटील यांची अधिसभा सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली असून १ मार्च पासून पुढील एक वर्षासाठी ही नियुक्ती असेल.

---

**बातमी क्र. २**

जळगाव दि. ६ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व राष्ट्रीय विज्ञान अकादमी यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित चार दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा नंदूरबार जिल्हयातील नवंगाव (शितलपाडा) येथे पार पडली. या कार्यशाळेत अनुसूचित जमातीच्या समुदायातील शेतकऱ्यांना शाश्वत शेती, हरीत ऊर्जा, कंपोस्ट खत निर्मिती व जैवतंत्रज्ञान आधारीत अर्थव्यवस्था या विषयांवर प्रशिक्षण देण्यात आले.

चार दिवसाच्या या प्रशिक्षण कार्यशाळेत वीस शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. या कार्यशाळेच्या पहिल्या दिवशी प्रशिक्षक म्हणून जैवशास्त्र प्रशाळेचे प्रा.ए.बी.चौधरी यांनी सुक्ष्मजीव यांची ओळख व त्यांना वाढीसाठी लागणारे साहित्य व त्यांचे खाद्यपदार्थ तयार करुन दाखले. त्यानंतर दुसऱ्या दिवशी जैवशास्त्र प्रशाळेचे प्रा.भूषण चौधरी यांनी हरीतक्रांती त्यांचे फायदे व तोटे हया विषयावर मार्गदर्शन केले. तिसऱ्या दिवशी बायफ हया संस्थेचे श्री.गणेश पाटील यांनी बायोगॅस या विषयावर मार्गदर्शन केले. तसेच्या दुपारच्या सत्रामध्ये माती परीक्षण कसे करावे यांचे प्रात्यक्षिक करण्यात आले. शेवटच्या दिवशी जैवशास्त्र प्रशाळेच्या डॉ.नविन दंदी यांनी जैवमात्रा प्रवर्तन हया विषयांवर मार्गदर्शन व गांडूळ खत निर्मिती या विषयांवर प्रात्यक्षिक घेतले. तसेच या कार्यशाळेत शेतकऱ्यांना जैविक खतांचा योग्य वापर कसे करावे, त्यांना कसे वाढवावे व त्यांचे फायदे व त्यांच्यामुळे होणारी शेतातील खर्चात बचत या सर्व विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. कार्यशाळेच्या यशस्वी आयोजन होण्यासाठी डॉ.स्वप्नील खरे व प्रतिक महाजन यांनी परिश्रम घेतले.

---

**बातमी क्र. ३**

जळगाव दि. ६ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील विधी प्रशाळा आणि बौध्दीक संपदा अधिकार कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, दि.१२ मार्च रोजी `इंटलेक्च्युअल प्रॉपर्टी राईटस् ॲण्ड पेटंट सिस्टीम इन इंडिया ` या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

या चर्चासत्रात पेटंट विषयी संशोधक विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली जाणार आहे. डॉ.दिनेश पाटील ( मुंबई), ॲड.सुशील अत्रे (जळगाव), निलेश पंडीत व डॉ.भास्कर इदगे (पुणे), डॉ.एस.ए.टी. सब्जेवारी (हैदराबाद), नुपूर गोयल (नवी दिल्ली) हे मार्गदर्शन करणार आहेत. विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर चर्चासत्राची माहिती देण्यात आली आहे. संशोधकांनी या चर्चासत्राचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजक डॉ.एस.आर.भादलीकर व प्रा.भूषण चौधरी यांनी केले आहे.

---

जा.क्र. : कबचौ उमवि/१६/हस्तदेय/२०१९ दिनांक : ६ मार्च, २०१९

प्रति,

मा. संपादक / प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
( डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी